**शब्दसाथ**

आपल्या आयुष्याचं रहाटगाडगं
रोजनिशीला वाहून घेतलेल्या व्रतासारखं
चालू असतं नियमीतपणे तेंव्हा -
लांबच रहातात शब्दं, आपल्याच नादात.
विसरून जाते मी त्यांचे अस्तीत्वं, परत्वे, व्यक्त होणे सुद्धा !
पण जेंव्हा बोचते, सलते, जळते आत काहीतरी
आणि वेदनेची हाक चित्कारते,
तेंव्हा कसे धावत पळत निघून येतात माझ्याकडे
असतील तसे, असतील तिथून....
माहीत असतो त्यांना
माझा 'रिते' होण्याचा धर्म
आणि त्यासाठी त्यांची लागणारी मदत.
झरतात मग ते लेखणीतून, कुरवाळतात हळुवारपणे...
एका-एका शब्दातून मोकळी होत जाते मी,
आणि नवा श्वास घेते!
आता,
परत लांब निघून जाताना, हसतात माझे शब्दं
आणि मी सज्जं,
नव्या उत्साहाने घाण्याला जुंपण्यासाठी !!

**©प्रीती देशपांडे**

[www.meetipreeti.com](http://www.meetipreeti.com)